Research essay.

Written by: HRISHIKESH JAGDALE

Pune City Pune Maharashtra, India

महार हा समाज सध्या इतरांसाठी अस्पृश्य वाटतं असला तरी त्यांची ही हालत का झाली असावी हे शोधण्याचा प्रयत्न कोणीही केलेला नाही.

महार अत्यंत जुन्या DNA पैकी अत्यंज आद्य मानववंशा पैकी आहेत.

[महार - महर - म्हार, म्हाल, मार, मेहत्तर, मेहर, मेहरा मिर मेहेर, मेर, मारी]

महार यांच्या १९५६ पूर्वीच्या ७२ पोटजाती

1. सोमवंशी (क्षत्रिय उच्च कुळी) हा महार वंश आहे
2. नागवंशी
3. कोल वंश (कोल झाड, कोळी नाही, सूर्यवंशी किंवा नागवंशी कोल)
4. अवने
5. अंधोण (आंध वन)
6. अनंत
7. कूलथ (कुल्थ)
8. ओढ कांबळे
9. वलही/ वलयी
10. बालकांबळे
11. बार्के
12. बावणा/ बावना
13. नाविशे
14. बेले
15. होन
16. बंकर (बनकर : धनगर कुळ महार गणात)
17. बोले
18. चेलकर (चेंलकर)
19. डोले
20. धेड
21. धार्मिक

22. डोम / डोंब
23. गरदी
24. गवसई
25. धडशी
26. घाटकांबले
27. गोंडवन (गोंडवाना)
28. गोपाळ
29. हेडशी
30. डोलार
31. झाडे
32. जोगति
33. जूनरे
34. कबूर्ले
35. लाडवन
36. आडवान
37. कांबळे
38. मढ कांबळे
39. मुरली
40. पान
41. प्रान
42. प्रधान
43. पूलार
44. रती
45. सलाडी/ सला दि
46. शीलावत
47. शिर साळ कर
48. सोन कांबळे
49. सोमय बळ
50. सुता ड
51. तिल वन
52. पान महार
53. विणकर
54. गसे वार

55. देशकर / देस कर
56. हटकर (धनगर कुळ महार गणात)
57. गोडालिमा
58. रायपुरे
59. धरशिक/घर शिक
60. डोंगर वार
61. झाडेवान
62. सुरती
63. पाजीनी/ पाजिंनी
64. म्हली
65. औढ
66. डोक
67. बावना
68. गवसे
69. कडवण
70. मेर
71. बैर
72. अजील
73. मारी
74. कासरे
75. खर्से
76. खोचरे
77. पुलार

(या वरील महार पोटजाती आहेत जे महाराष्ट्रात तसेच इतर राज्यांत होत्या. त्यातली *सोमवंशी, नागवंशी, कोल वंशी, मेघवंशी हे महार वंश आहेत, त्यातली सोमवंशी , कोल, नाग हे क्षत्रिय दर्जाचे होते तेच राजपूत मध्ये सुद्धा गेले)*

मेघवंश हा महाराष्ट्रात नाही तो इतर राज्यांत आढळतो.

वरील महार पोटजाती □□□□ ***बॉम्बे स्टेट च्या जनगणनेत*** *होत्या ज्या* □□□□ *ला बौद्ध झाल्यानंतर लोप पावले नंतर काही फक्त पोटजाती सोबत महार लावण्या ऐवजी फक्त महार हेच लावू लागले)*

1. नागवंशी काय आहे? नागवंश हा अतिप्राचीन मानव वंश आहे जो समस्त पृथ्वीवर आढळतो, नागवंशी महाराष्ट्र, मध्य भारत, उत्तर भारतात, व दक्षिण भारतात राज्य

करत होते. दक्षिणेतील जो द्रविड वर्ग आहे पूर्वी सगळाच नागवंशी होता नंतर इतर समूहाचे तिथे स्थलांतर झाले . नागवंशी हा कुणबी यांच्यात सुद्धा आढळतो, तो भारशिव नाग असा क्षत्रिय सुद्धा भारतात आहे. तो महाराष्ट्रात कुणबी आणि महार या कृषक गणात जास्त आढळतो.

महार हा राजन्य म्हणजे क्षत्रिय गण होता त्यांची राज्य ही विविध ताकतवर राजांनी काबीज केली.

> महार हा मूलतः सोमवंशी म्हणजे चंद्रवंशीय क्षत्रिय होता ते स्वतःला पांडवांचे वंशज मानतात. त्यांच्यात नागवंशी म्हणजे शिव महादेवाचे वंशज आणि नाग पूजक, आणि मेघवंश व कोलवंश (कोल झाड) हे सुर्यवंशी कोल असे एकूण महार क्षत्रिय होते

महार समुदायात सोमवंशी क्षत्रिय हा पांडवांचे वंशज सर्वात उच्च मानले जात. त्यांची संख्या ही महाराष्ट्र व राजस्थानात जास्त होती.

त्याचं बरोबर विदर्भात व कोकणात नाग वंश का महार होता. तसेच कोकणात कोल हा महार गण सुद्धा होता नंतर हे कोल कबीरपंथ महार सुद्धा म्हटले जात.

सोमवंशी महार हा अहमदनगर, नाशिक, पुणे, आणि आसपासचे जिल्हे यात जास्त होता. त्यांची संख्या ही सर्वाधिक होती त्या खालोखाल नाग आणि कोल यांचीही होती.

> राजस्थानात मेहर हे महार सोमवंशी म्हणजे चंद्रवंशी राजपूत आहेत. तर पाकिस्तानचे सिंध मध्ये आदिवासीं मेहर सिंधी राजपूत आहेत. पाकिस्तानात जसे मराठा हे मुस्लिम बनवण्यात आले तसे आदिवासीं मेहर महार ही मुस्लिम बनवण्यात आले.

पाटीलकी महारांना देखील होती.

- अनेक गावांत महार हे पाटिल देखील होते याचा संदर्भ: बलुतेदार आणि त्यांचे धंदे (पुस्तक) - इरावती कर्वे.
- इरावती कर्वे लिखित बलुतेदार आणि त्यांचे धंदे यात त्यांनीं सांगितलेलं च आहे की महार हे काही गावचे पाटील होते. ते जपण्यासाठी चांगली कामे व प्रयत्नशील असत.
- पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, अहमदनगर, बुलढाणा इत्यादी भागात काही गावांत महार हे पाटिल असल्याचे नोंदी पेशवेकालीन पत्रांत आहे.

- काही गावे वगळता सर्वत्र मराठा, धनगर असे पाटील असत.

1. महारांचे भारतात छोटे छोटे स्वतःचे राज्य होतें जिथे त्यांचे गणाचे राजा राज्य करतं असे
2. कोकणात नागवंशी महार गणाचे राज्य होते हे एक उदाहरण आहे. ते राज्य कदंब वंशी यांनी जिंकले पूर्वी कोण कोणत्या वंशाचा याला काही अर्थ नव्हता फक्त राज्य विस्तार करणे हेच मुळ ध्येय होते. त्यात नाग गणाच्या महार लोकांचे राज्य गेलं आणि कदंब राजे झाले.
3. त्यानंतर काही कालखंड लोटल्यानंतर अलुतेदार बलुतेदारी पद्धत आली त्यात महार यांना बलुतेदारी मिळाली मान पान होता पण उपासमार होउ लागली सरकारची कामे करण्याची बदल्यात त्यांना गावकऱ्यांकडून अन्न मिळण्याचे अधिकार होतें उपजीविका साठी धान्य घेण्याचे अधिकार होतें पण ते मिळत नसे त्यामुळं ते अत्यंत मागास बनले सरकारी चाकरी मुळे त्यांची संपत्ती वाढलीच नाही. ते अत्यंत दुरावस्थेत गेले...
4. पूर्वी दुष्काळ भयंकर आणि वारंवार पडे प्रचंड मनुष्य आणि प्राणी मरत असे मग प्राणी मेले की ते उघड्यावर पडले की त्यामुळे रोगराई पसरत त्यामुळे त्यांना चांभार मांग महार यांच्याकडे देत चांभार त्यापासून पायदान वैगेरे वस्तू बनवत, आणि सुरुवातीला काही भाग मांसाहार दिला जात असावा. त्यात प्राणी ओढण्याची मोठी जबादारी मांग समाजाची असायची व तोच त्यांची विल्लेवाट लावे.
5. कधी कधी ही कामे ग्राम रक्षक महार लोकांना मजबुरीने करावी लागे जिथे मांग कमी असतं त्या ठिकाणीं. अशी ठिकाणे खूप कमी होत.

```
1. महारांचे आदिवासी- द्रविड किंवा आर्य- कृषक- क्षत्रिय - रक्षक - सैनिकी पेशा -
   बलुतेदारी - अस्पृश्य असा प्रवास आहे.
```

काही लेखकांनी महार हे मुळ आर्य असून त्यांच्यावर नागवंशीय संस्कार झाल्याचे सांगतात. त्यातच महार हे मुळ लढाईत भाग घेणारी जमात आर्य होति. त्यातच बहुतांशी महार हे सोमवंशी म्हणजे चंद्रवंशीय असल्याचे मानतात, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यानंतर सर्व महार हे एकच झाले त्यांच्यातील ७२ पोटजाती नष्ट करण्यात आल्या म्हणजे फक्त महार लावण्यात आले. व सर्व स्वतःला नागवंशी समजू लागले.

कारण हेही असावे काही काळा पूर्वी त्यांच्यात व काही मराठा - कुणबी सुद्धा आडनाव नाग - नाक अशी लावत त्यावरून महार हे नाग असल्या चे घोतक आहे.

अनेक लेखक असेही लिहितात की, महार ही अस्सल देशी रांगडी जमात आहे ते त्यांना अनार्य म्हणतात म्हणजे हे महार एकतर आदिवासीं गोंड आदिवासी आदीद्रविड असावेत किंवा द्रविड.

पूर्वीच्या महार पुरुषांचे कृष्णवर्णीय सावळा रंग व सुडौल बांधा जाड बांद्याचे शरीर पाहता ते आदिवासीं असावेत आणि ते स्वतःला जे काही सोम वंशी म्हणतात तेही सिध्द होतेच कारण सोम वंश म्हणजे चंद्रवंशी जो त्याच पासून यदुवंश पूढे गेला. सोम हा ब्रम्हा पासून व सोम पासून यदुवंश पूढे आला.

याचा अर्थच असा आहेत जे चंद्रवंशी, यदुवंशी आहेत त्यांचा च एक गट हा महार आहेत. यादव यदुवंश आहे त्यांचा च हा तुटलेला गट असावा.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महारांना (ब्रोकन) म्हटल आहेत म्हणजे मुळ गटपासून तुटलेला, तसे महार जातीत म्हणजे गणात ७२ पोट जाती होत्या.

धनगर समाजातील तीन -चार कुळ वा पोटजाती ही महार यात सुद्धा आलेली आहेत.

1. हटकर
2. खरात
3. बनकर
4. झाडे

तसेच सातवाहन/ वाकाटक/चालुक्य/राष्ट्रकुट ही राजवटी महार बौद्ध नाग ही आपली मानतो तसेच धनगर समाज हा ही राजवटी आपल्या धनगर मेंढपाळ वंशाचे मानतो, दोघेही महार व धनगर प्राचिन काळी एकच असावेत कारण दोघेही सुरूवातीच्या काळात मध्य भारतात सोबतच भटकंती करत होते. ते दक्षिणेकडे आले व त्यातल दोन्ही गट वेगळं वेगळं झाले. २०००-३००० हजार वर्षात जातींची नावे बदलत गेलेली आहे.

सोमवंशी महार हा मोठ्या संख्येने होता तो स्वतःला पांडवांचे वंशज मानतो त्यामुळंच त्यांच्यात महाभारत, रामायणातील व नाग लोकाची नावे मुलांना ठेवल्याचे पश्चिम महाराष्ट्रातील जेष्ठ पुरुषांच्या नावावरून कळते च

महार हा राजपूत असावा का??

महार हा स्वतःला सोमवंशी क्षत्रिय मानतो, ७२ पोटजातीत सर्वात मोठी व उच्च सोमवंशी आणि नंतर नाग व कोल होते नंतर इतर.

सोमवंशी यांत सोमस हे आडनाव असल्यानं यांची खरी पुष्टी होतेच की हे मुळातच सोमवंशी आहेत. सोमवंशी महार यांच्यात धनगर, राजपूत, कुणबी यांची आडनावे आढळतात

व नाग वंशीय लोकांत काही मुळ आडनावे जशी कांबळे, गायकवाड अशी होते.

सोमवंशी महारांत - राजपूत, राजे राजपूत, राणे राजपूत, राणा सिंह, रणसिंह, चौहान, चव्हाण, अशी क्षत्रिय आडनावे अहमदनगरच्या सोमवंशी महार आजचे बौद्ध यांच्यात आहेत.

राजश्री शाहू महाराजांनी महारांना आमची मराठ्यांची आडनावे लावा या वाक्याला पुरावा देखील नाही.

याचे कारण तसे असते तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे लहानपणीचे आडनाव सकपाळ होते.

काही ७२ पैकी पोटजाती स्वतःला महार हेचं आडनाव लावीत असावेत जसे माळी समाजात काही माळी आडनावाचे लोक आहेत तसे.

काही लोक नाग - नाक आडनाव लावित तर काहीं पोट जातीची गायकवाड, कांबले, वाघमारे ही पूर्वीचीच आडनावे कायम होति, शिवरायांच्या काळात एक किल्लेदार हा महार हा "बेंगळे" या आडनावाचा पश्चिम महाराष्ट्रात होता यांचा अर्थ हाच की **:**

पूर्वी महार लोकांना मुळ आडनावे होति व ती शाहू वा शिवरायांनी त्यांची आडनावे लावण्याचे सांगितले ही एक अफवा आहे व काही इतिहास लपविण्यासाठी हे myth पसरविले आहे.

राजस्थानात काही महार जाती स्वतः ला चंद्रवंशीय राजपूत मानतात व महाराष्ट्रतील राजपूत व कुणबी आडनावे यावरून हेचं लक्षात घेण्यासारखे आहे की महार समूदायाला हजारों वर्षापासून लष्करी पेशा आहे ते प्राचिन कृषक होते पण फार कमी काळ त्यांना शेती हा व्यवसाय करण्याची संधी मिळाली ते बऱ्याच काळ लष्करात असलेले पाहण्यात आलेलं आहे.

सोन्याचा व्यवसाय महार प्राचिन काळी करत:

कोकणातील महारांचे राज्य जेव्हा कदंब यांनी जिंकले तेंव्हा ते कोकणात इतर ठिकाणीं वसून त्यांनीं सोने चांदी हिऱ्यांचा व्यवसाय सुरू केला.

> महार हे आत्ता जरी अस्पृश्य वाटतं असले तरी त्यांचाकडे पूर्वी वैभव संपन्नता होति हे नाकारता येत नाही ते अस्पृश्य कसे बनले हा संशोधनाचा विषय आहे.
>
> वेदात मांग समाजाचा जसे चांडाळ व पर्यायी शब्द मातंग म्हंटले तसे महार गणाला वेदात कोठेही शूद्र म्हटलेलं नाही.
>
> वेदात महार यांना महरलोक म्हंटले आहे देवलोक,महरलोकं अशी वर्णनात त्यांचा उल्लेख आहे.
>
> उदा.**भूर्लोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक(महरलोकं), जनलोक, तपोलोक और ब्रह्मलोक**।
>
> एका ब्राह्मण लेखकाने त्यांना आर्य असल्याचं तर्क दिलेला आहे. तर इतर सर्वांनी त्यांना अस्सल देशी जमात म्हटलेलं आहे.

कोकणात सोमवंशी नाग आणि कोल तिन्ही वंश होते. काही लेखक कोकणातील महार गण स्वतःला सोमवंशी असल्याचं मानतो असे लिहितात.

भारतातील महार गणाचा प्रवास थोडक्यात :

1. महार हा सुरूवातीला आदिवासीं असावा
2. नंतर तो विभागला गेला
3. महार हा मुळ कृषक असल्याने तो उत्तर, मध्यभारत, व दक्षिण मध्ये कृषी करू लागला
4. तो पशुपालक बनला
5. महार हा लढाकू, लढाईत भाग घेणारा व हा त्याचा मुळ गुणधर्म असल्यानं तो गरज पडेल तेव्हा लढाईत भाग घेई व त्यांचे शत्रूला भुलवण्याची पद्धत यामुळे काही राजवटीत त्यांना सैन्यात भरती करून घेतले जात.
6. महार गणाचे भारतात अनेक छोटे मोठे राज्य होते महार गणाचे राजे तिथे राज्य करीत व त्यांचे टोटेम चिन्ह वापरत जसे, नाग, हत्ती, चंद्र सोम
7. महार हे मध्य भारत (राजस्थान,छत्तीसगढ, मध्यप्रदेश व महाराष्ट्र यात) अगदी सुरूवातीला येऊन वसला त्यांच्या समूहात विभागणी झाल्याने ते विविध प्रदेशात भटकंती करत गेले व तिथेच वसले.
8. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात महार सुरूवातीला वसले
9. त्यांचा एक मातृवंशी बांधव मेंढपाळ होता तो यांच्यापासून विभागला असावा.
10. महार गणची विविध छोटी मोठी राज्य विस्तारली ते नाग, चंद्र, हत्ती हे चिन्ह वापरत.
11. महार हे प्रकृती पुजक होते ते नाग, हत्ती, चंद्र, सूर्य यांना पुजत असे.
12. ज्या गोष्टींची ते पुजा करीत त्यांनाच ते राज चिन्ह म्हणून वापरत होते.
13. गणपती हे हत्ती नागवंश गणाचे प्रतिक चिन्ह आहे.
14. बौद्ध पाली भाषेत हत्ती आणि नाग सर्प याला (नाग) हा शब्द आहे.
15. महार हे सर्प नाग आणि हत्ती याचे पूजक होते.
16. महार यांनी वेगवेगळ्या प्रदेशांत नाग, सोमवंशी, कोल या नावाने राज्य केल्याने त्यांची प्रतिके नाग, हत्ती, व चंद्र आणि तलवार अशी आहेत.
17. तसेच कुणबी मध्ये काही नागवंशाची कुळ आहेत जसे. शिंदे
18. महार हे पूर्वी शिव महादेवाचे पुजक होते, तसेच खंडोबा, म्हसोबा.
19. महार हे तुळजा भवानीला त्यांच्या कुळाची मातृ देवता मानत असे.

```
20. तसेच मरीआई चे मुख्य पूजक हे महार गणाचे होते. मरी आई ही अष्ट भुजा आहे व
   भवानी माता देखील अष्ट भुजा आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी, मरी आई, भवानी या
   एकाचं देवीच्या वेगवेगळी नावे आहेत.
```

महार हे पुरोहित सुद्धा होते...

महार हे शिवाचे पूजक होते परंतु त्यांनी इंद्र व अग्निपुजा नाकारल्याने, ते अनार्य होते.

ते मरीआई, भवानी माता, या मातृ देवतांचे पूजक होते बौध्द धर्म स्वीकारण्याच्या आधी ते या देवतांचे मुख्य पुजारी होते. भवानी चे पुजारी महार सोबत मराठा देखील असत.

दक्षिणेत यल्लमा, मातंगी , लक्ष्मी चे ते पुजक होते.

लक्ष्मी , मरी आई, भवानी या महार यांच्या कुळाच्या मुख्य मातृ देवता

शिव, खंडोबा, विनायक (गणपती) , म्हसोबा हे त्यांचे कुळाचे देवता . असत.

> महार हे बौद्ध उपासक झाल्यानंतर त्यांचे त्यांचा पुरोहित आणि पुजारी हा पेशा कमी झाला व मांग/मातंग या समाजाला तो मान मिळू लागला. महार हेचं मुख्य पुजारी वर्ग होता. पण कालांतराने मरी आई, भवानी, पैकी मरी आई चे पुजारी मांग झाले व भवानी ही महार सोबत मराठा

महार समुदायाची आर्थिक संपन्नता:

यादव व निजाम काळाच्या आसपास १४ व्या शतकात मोठा दुर्गा नावाचा कोरडा दुष्काळ पडलेला होता. त्याकाळात अनेक जीवित हानी झाली त्याकाळी सुद्धा महार व्यक्तींनी लोकांना धान्य वाटप केल्याच्या इतिहासात नमुद आहे परंतु जसा जसा काळ लोटत गेला तसे तसे महार हे आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास झाले व काहीं इतर कारणांमुळे ते भारतात अस्पृश्य झाले.

महार ही एक उपाधी वा सन्मानाची पदवी होति.

पंजाब आणि राजपुताना स्टेट मध्ये ***महार, मिहीर, मीर*** या गूर्जरांना असलेल्या सन्मानाची पदवी होति. असे रॉबर्टसन नावाचा लेखक लिहितो असे त्याच्या अभ्यासात त्याच्या लक्षात आले.

तसेच

नाग लोकांना पूर्वी एका काळी **महार** ही सन्मानाची उपाधी होति असे म्हंटले जाते.

परंतु वर्तमान काळात या महार शब्दाला महाराष्ट्रात लोकं वेगळ्या अर्थाने घेतात. व महार म्हटले की अस्पृश्य असा लोक अर्थ लावतात. हे लोक बौद्ध झालेले आहेत.

> तसेच भारतात सर्व प्रथम योग विद्या ज्यांना अवगत होती ते नागवंशी नाग होते, या योग विद्येचे नाग लोकांनी बौद्ध धर्म मार्ग स्वीकारला होता व ते प्राचिन काळी बौद्ध संघात गेले.
>
> त्यामुळे महाराष्ट्रतील नाग वंश असलेला महार असे म्हणत आहे की आम्ही प्राचिन काळीच बौद्ध होतो आणि बौद्ध हा महार गणाचां देखील धर्म होता

काळाच्या ओघात **महर** समुदायाचे उत्तर भारतात मेहेर, मेहरा असे नाव झाले. मध्य भारतात महार झाले. उत्तर भारतातील अनेक शब्दकोशात 'महरा' म्हणजे सरदार, मुखीया असा अर्थ दिला आहे. ब्रज भाषेत सुद्धा 'महर' शब्द आहे. ओरिसातील अभिलेखात महर लढवय्यांचा उल्लेख आलेला आहे. महार हे पंजाब व राजपुतानामध्ये सुद्धा आहेत. 'मेहेरबान' हा शब्द त्याचेच रूप असून त्याचा अर्थ दयाळू, दयावान असा आहे. पुरीच्या जगन्नाथ विहारात धार्मिक विधी महर ज्ञातीचे लोक करीत. आसाम आणि ओरिसातील शिलालेखात 'महर' शब्द आढळून आला आहे...

भारतखंडातील पसरलेल्या 'महर' या ज्ञातीची व्याप्ती पाहता निश्चितच हा शब्द महा, भव्य, प्रमुख अशा आदरार्थी अर्थाने सुवर्णभूमीत रुजला असल्याचे स्पष्ट दिसते.

अरब देशांत आर्य बादशाह "आर्य मेहर" ही पदवी लावतात ज्यात मेहेर वा मेहर चा अर्थ श्रेष्ठ वा ' रत्न ' असा होतो.

महार हा शब्द फक्तं भारतातच नव्हे जगभरातील विविध देशांत आढळलेला आहे.

म्यानमार ब्रह्मदेशात "**महार"** या नावाने मोठ्या कंपन्या, मोठे हॉटेल्स, स्थळे ही महार नावाने आहेत हे पाहून आश्चर्य वाटेल.

महार गण हा बहुतांश मातृसत्ताक असावा.

महार गणात स्त्री ला सत्तेत महत्त्वाचा केंद्रबिंदू मानल्याचे दिसते. त्यांची राज्य ही बहुतांश स्त्रिसत्ताक/ मातृ सत्ताक होति तसेच काहीं प्रदेशांत पुरूष सत्ताक सुद्धा असतं.

उदा. महार गणात राज्य करते वेळी ती राज्य स्त्रीसत्ताक असत. सातवाहन काळातील नागवंश ची महाराणी नागनिका.

महार गण राज्य कारभार करते वेळी कोणते नावं वापरत असावा.

महार गण राज्य करताना नागवंश (नाग) , सोमवंशी , कोल वंश हीच नावे वंश गणाचे वापरत असावा. **कारण महार ही पदवी वा उपाधी होति असे काहीं लेखक म्हणतात.**

> **वी रा शिंदे लिहितात: महार/ महर म्हणजे मोठा, पसरणारा, विस्तृत वा महान.**

1. उदारणार्थ: इस्लाम या धर्मात महर हा शब्द आहे त्यांचा अर्थ हुंडा असा होत असावा. वधू ला वराकडून जी रक्कम दिली जाते त्याला महर म्हंटले जाते महर- ए - फातिमी असेच काहीतरी म्हणतात. याचा महार समुदायाच्या महर शब्दाशी संबंध येत नाही....